दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक ३५ वा शुक्रवार दि.०५ जुलैं २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## समाज कल्याण विभागाच्या वसतिगृहातील प्रवेश प्रक्रिया संशयास्पद - डॉ. नितीन राऊत

### सभागृहात प्रश्न उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधले



नागपूर / प्रतिनिधी :- सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य अंतर्गत राज्यभरात वसतिगृहे चालवली जातात. नागपूर जिल्ह्यातील समाज कल्याण विभागाअंतर्गत वसतिगृहांमधील ऑफलाईन प्रवेश प्रक्रिया संशयास्पद आहे. प्रवेश प्रक्रियेत अधिकारी पारदर्शकता बाळगत नसल्याचे अनेकदा दिसून आले आहे. वसतिगृहे ही मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या हक्काची असून ती काही अधिकाऱ्यांची खासगी मालमत्ता नाही. समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहांमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पारदर्शीपणे प्रवेश का दिला जात नाही? मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा प्रश्न आज राज्याचे माजी मंत्री आणि उत्तर नागपूरचे आमदार डॉ.नितीन राऊत यांनी सभागृहात उपस्थित करुन राज्य शासनाचे या विषयाकडे लक्ष वेधले. सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य अंतर्गत येथील वसतिगृहांमध्ये विविध अभ्यासक्रमांचे आणि वयोगटातील विद्यार्थी राहून शिक्षण घेतात. त्यात आठवी ते पदव्युत्तरच्या विद्यार्थ्यांचा समावेश असतो. जिल्हा समाजकल्याण विभाग आणि उपायुक्त कार्यालयात दरवर्षी हजारो विद्यार्थी प्रवेशासाठी पर्यंत करतात. परंतु अधिकऱ्यांच्या चुकी मुळे अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे डॉ. राऊत म्हणालेत. नागपूर जिल्ह्यात समाजकल्याण विभागाची २५ वसतिगृहे असून त्यापैकी १४ वसतिगृहे नागपूर शहरात आहेत. त्यामध्ये विद्यार्थिनींची सहा तर, विद्यार्थ्यांची आठ वसतिगृहे आहेत. परंतु, समाजकल्याण विभागाने या वसतिगृहांची प्रवेशक्षमता किती आहे, सध्या किती विद्यार्थ्यांना प्रवेश दिला गेला, किती जागा रिक्त आहेत, प्रवेशाचे निकष काय आहेत, प्रवेशाकरिता प्रसिद्ध केलेली जाहीरात इत्यादी आवश्यक माहिती सादर केली नाही ज्यामुळे उच्च न्यायालयाने देखील वसतिगृहातील प्रवेश प्रक्रियेवर ताशेरे ओढले असल्याचे डॉ. राऊत यांनी सांगितले. अनेकदा चालू शैक्षणिक वर्षाचे अर्धे सत्र संपल्यानंतर ही सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहात विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपली व्यवस्था स्वतः करावी लागते व यासाठी पालकांना मोठा आ र्थिक भुर्दंडही सोसावा लागतो आहे. शिवाय विद्यार्थ्यांना विविध भत्त्यांच्या लाभापासूनही वंचित राहावे लागत असल्याचा आरोप यावेळी डॉ. राऊत यांनी केला.

## बिघडलेल्या कचरा व्यवस्थापनामुळे लातूरकरांचे आरोग्य धोक्यात कंत्राटदार एजन्सीला काळया यादीत टाकून अद्यावत यंत्रणेचा वापर करावा-आ.अमित देशमुख



लातुर / प्रतिनिधी : -लातूर शहरातील बिघडलेल्या कचरा व्यवस्थापनामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे शासनाने हस्तक्षेप करुन ते त्वरीत दुरूस्त करावे. प्रशासकीय काळातील ढिसाळ पध्दतीने झालेल्या या कामांची चौकशी करावी, आगामी काळात नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन याकामांसाठी प्रभावी यंत्रणा उभारावी, अशी मागणी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज विधानसभेत लक्षवेधीव्दारे केली आहे. लातूर शहरातील बिघडलेल्या कचरा व्यवस्थापना संदर्भात आज विधानसभेत माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लक्षवेधी सुचना मांडून शासनाचे या गंभीर समस्येकडे लक्ष वेधले. या प्रसंगी बोलतांना आमदार अमित देशमुख म्हणाले की, राज्यात मुंबई, पुणे, नागपूर, नाशीक, ठाणे यासारख्या महानगरातही कचऱ्यांची समस्या आहे, ही वस्तुस्थिती आहे. मात्र लातूर सारख्या लहानश्या शहरातही या संदर्भात गंभीर समस्या निर्माण व्हावी ही चिंतेची बाब आहे. सदया लातूर शहरात सर्वत्र ठिकठिकाणी कचऱ्यांचे ढिग दिसत असून त्यामुळे परीसरात दुर्गंधी पसरली आहे. शहरातील नागरीकांचे यामुळे आरोग्य धोक्यात आले आहे. मनपा प्रशासन आणि संबंधित कंत्राटदारांना वेळोवेळी सुचना देऊनही यात काहीही फरक पडतांना दिसत नाही. नागरीक स्वच्छता कर भरतात, शासन अनुदानही देते मात्र कचरा व्यवस्थापनाचे काम व्यवस्थित होत नाही ही बाब गंभीर आहे. लातूर शहरातील कचरा व्यवस्थापनाचे काम एकच कंत्राटदार मागच्या अनेक वर्षापासून करीत आहे. या कंत्राटदारा बद्दल पुर्वीही तक्रारी होत्या, मात्र मागच्या दोन तीन वर्षाच्या प्रशासकांच्या कार्यकाळात शहरात कचरा व्यवस्थापन नावालाच उरले आहे. या काळात या कंत्राटदाराला किती बीले मिळाली आणि त्या पैशाचा विनीयोग झाला का त्यांची चौकशी होणे आवश्यक आहे.शहरातील कचरा व्यवस्थापनासाठी नवीन निवीदा निघाली असल्याचे शासनाच्या वतीने सांगण्यात येत आहे. या नवीन निवीदेत पून्हा त्याच कंत्राटदाराला काम मिळणार की, त्याला काळया यादीत टाकले जाणार हा माझा प्रश्न असल्याचे आमदार देशमुख यांनी यावेळी बोलतांना म्हटले आहे. कचरा व्यवस्थापनासाठी नवीन तंत्रज्ञान उपलब्ध झाले आहे, अनेक ठिकाणी या कचरापासून खत, बायोगॅस आणिवीजनिर्मीती केली जात आहे. त्या पध्दतीचे नियोजन करुन लातूर शहर स्वच्छ, सुंदर ठेवणाऱ्या एजन्सीला काम दिले जावे अशी सुचनाही आमदार अमित देशमुख यांनी मांडली. विभागीय आयुक्ता मार्फत चौकशी लातूर शहरातील कचरा व्यवस्थापनाची विभागीय आयुक्ता मार्फत चौकशी केली जाईल.

यात कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही.

## फडणवीसांसह अभिनेता स्वप्नीलला झापले




मुंबई : ऑनलाईन रमी, ऑनलाईन जुगारबाबत स्वराज्य पक्षाने आक्रमक भूमिका घेतली आहे. हे तात्काळ बंद करावेत. या कायद्यात तुम्ही बदल केला नाही किंवा सभागृहात या विषय मांडला नाही तर येत्या ९ तारखेला आम्ही तुम्हाला जाब विचारु, असा इशारा संभाजीराजे यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला आहे.

संभाजीराजेंनी म्हटले आहे की, स्वराज्य पक्षाचे सरचिटणीस डॉ धनंजय जाधव यांनी पोलिसांकडे पाठपुरावा केला.पोलिस म्हणतात की ऑनलाईन रमी, ऑनलाईन जुगार असे खेळ खेळू नका. ते बेकायदेशीर आहेत आणि कोण खेळताना दिसले की त्याच्यावर कडक कारवाई करणार! आणि त्याच पोलिसांचे गृहमंत्री काय म्हणतात? आपल्याला महसूल मिळतो पैसा मिळतो मग चालूदे ! म्हणजे गृहमंत्री आणि पोलिस यांच्यातही काही समन्वय नाही! रमी खेळणे म्हणजे वाईट गोष्ट आहे, चुकीची गोष्ट आहे अशी शिकवण आपल्याला लहानपणापासूनच समाजात मिळत असते. मात्र आता उघडपणे रमी खेळा म्हणून केल्या जाणा-या जाहिराती आपण समाज म्हणून कशा काय सहन करू शकतो? मला फडणवीस साहेबांच्या वक्तव्याच आश्चर्य वाटतं, पण आरआर आबा यांच्या सारखा धाडसी निर्णय फडणवीस घेणार का ? असा सवाल त्यांनी केला.

हे सर्व थांबावे यासाठी गेल्या वर्षभरापासून स्वराज्य पक्षाने यावर सर्व चौकशी करून, या विषयाच्या मुळापर्यंत जात सर्व माहिती काढलेली आहे. ज्या जाहिराती दाखवल्या जातात, जाहिरातींमधून जी प्रलोभने दिली जातात, श्रीमंत होण्याचे आमिष दाखवले जाते ते सर्व खोटे असते याचे सर्व पुरावे स्वराज्य पक्षाने गोळा केलेले आहेत.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी रशियाला जाणार

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी ८ ते १० जुलै २०२४ रोजी रशियन फेडरेशन आणि ऑस्ट्रिया रिपब्लिकला अधिकृत भेट देतील. रशियन फेडरेशनचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या निमंत्रणावरून २२ व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेला उपस्थित राहण्यासाठी पंतप्रधान ८ ते ९ जुलै दरम्यान मॉस्को येथे असणार आहेत.



याबाबत परराष्ट्र मंत्रालयाने एक निवेदन प्रसिद्ध केले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, दोन्ही नेते दोन्ही देशांमधील बहुआयामी संबंधांचा सखोल आढावा घेतील आणि परस्पर हिताच्या समकालीन प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर विचार करतील. यानंतर पंतप्रधान ९-१० जुलै २०२४ दरम्यान ऑस्ट्रियाला भेट देतील. ४१ वर्षांतील भारतीय पंतप्रधानांचा हा पहिला ऑस्ट्रिया दौरा असेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी ऑस्ट्रिया प्रजासत्ताकचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर व्हॅन डेर बेलेन यांची भेट घेतील आणि ऑस्ट्रियाचे चांसलर कार्ल नेहॅमर यांच्याशीही चर्चा करतील. पंतप्रधान आणि कुलपती भारत आणि ऑस्ट्रियातील व्यावसायिक नेत्यांनाही संबोधित करतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी मॉस्को तसेच व्हिएन्ना येथे भारतीय समुदायाच्या सदस्यांशी संवाद साधतील.

## नीट परीक्षेत लातूरमध्ये दहा विद्यार्थ्यांचे गुण वाढवून दिले




मुंबई : बिहारच्या पाटण्यात उघड झालेल्या नीट परीक्षेच्या घोटाळ्याचे धागेदोरे महाराष्ट्रात सापडत आहेत. मराठवाड्याच्या लातूरला विद्येची नगरी म्हटले जाते, तिथे सीबीआयची टीम तपास करत आहे. तब्बल १० विद्यार्थ्यांचे गुण वाढवून दिल्याचे प्रकरण पुढे आलेले आहे.

नीट परीक्षेत १० विद्यार्थ्यांचे गुण वाढवून दिल्याची माहिती सीबीआय चौकशीत समोर आली असून सीबीआयचे अधिकारी लातूरात नीट परीक्षेच्या चौकशीसाठी ठाण मांडून आहेत. विशेष म्हणजे नीट बरोबर इतर स्पर्धा परीक्षांचे देखील प्रवेश पत्र अधिका-यांना तपासामध्ये आढळले आहेत. नीट परीक्षेतील गैरव्यवहार प्रकरणी लातूरमध्ये चार आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. यामध्ये दोन आरोपी सध्या सीबीआयच्या अटकेत आहेत तर इतर दोघांचा शोध सुरू असल्याची माहिती समोर येत आहे.

अटकेत असलेल्या दोन आरोपींच्या मोबाईलमधून आतापर्यंत १० विद्यार्थ्यांना नीट परीक्षेत गुणवाढ करुन दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. तर हे १० विद्यार्थी कोण आहेत याचा मात्र खुलासा सध्या तरी झालेला नाही. त्यामुळे या विद्यार्थ्यांचा आणि बिहार राज्यातील संशयास्पद परीक्षा केंद्राचा नेमका संबंध काय? याचा तपास आता सीबीआय अधिक वेगाने करत असल्याची माहिती आहे.

८ जुलै रोजी एकूण २६ याचिकांवर सरन्यायाधीश चंद्रचूड, न्या. मनोज मिश्रा आणि न्या. जे. बी. पारडीवाला यांच्या खंडपीठासमोर सुनावणी होणार आहे. 'एमबीबीएस', 'बीडीएस', 'आयुष' तसेच इतर वैद्यकीय अभ्यासक्रमांसाठीचे प्रवेश 'नीट' परीक्षेतील गुणांच्या आधारे दिले जातात. सध्या अटकेत असलेल्या दोन्ही आरोपींच्या मोबाईलमधून मिळालेल्या माहितीनुसार लातूर शहरातील तोडकर, उप्पलवार आणि डोंगरे या तिघांचे यामध्ये काय कनेक्शन आहे याची सीबीआयकडून चौकशी सुरु आहे.

## रेणापूर पंचायत समिती गटविकास अधिकाऱ्यांचा भ्रष्ट कारभार चौकशी करून निलंबित करण्याची मागणी

### पत्रकार संघाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



रेणापूर/प्रतिनिधी : रेणापूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडून भ्रष्टाचार केला जात असून त्यांची चौकशी करून निलंबनाची कार्यवाही करावी,अशी मागणी रेणापूर तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत शिवरस्ते,पाणंद रस्ते, बिहार पॅटर्न वृक्ष लागवड, ग्रामपंचायत भवन बांधकाम,सिंचन विहीर, शेततळे व इतर योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात कुशल व अकुशल कामे करण्यात आली आहेत.गटविकास अधिकाऱ्यांच्या आशीर्वादामुळे या कामांमध्ये मोठा भ्रष्टाचार झाला आहे.नियम डावलून ही कामे करण्यात आली आहेत.बिहार पॅटर्न वृक्ष लागवड योजनेअंतर्गत लावलेली झाडे नियमानुसार नाहीत. शिवरस्त्याची कामेही नियमानुसार झाली नाहीत.मनरेगा अंतर्गत केलेल्या सिमेंट रस्त्यांना तडे गेले आहेत,अशी तक्रार निवेदनात करण्यात आली आहे.

गटविकास अधिकारी व पंचायत समितीचे कर्मचारी कार्याच्या ठिकाणी निवासस्थानी राहत नाहीत.पंचायत समिती स्तरावर १५ व्या वित्त आयोगाचा शासकीय खर्चासाठी राखीव असलेला निधी चुकीच्या पद्धतीने खर्च करण्यात येत आहे.गटविकास अधिकाऱ्यांकडून शासकीय वाहनाचा गैरवापर केला जात आहे.

या सर्व बाबींची दखल घेऊन झालेल्या कामांची चौकशी करावी.या कामांना जबाबदार असणाऱ्या गटविकास अधिकाऱ्यांना निलंबित करावे अन्यथा पंचायत समिती कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही या निवेदनात देण्यात आला आहे.

निवेदनावर पत्रकार संघाचे अध्यक्ष नामदेव शिंदे यांच्यासह बालाजी कटके,सुधाकर फुले, रफिक शिकलकर,सिद्धार्थ चव्हाण,ईश्वर बद्दर, वाल्मीक केंद्रे,बाळय्या स्वामी,शरद राठोड, कोंडीराम काळे,निजाम शेख,शिवाजी यमते, मधुकर गालफाडे,गोपाळ चिताडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

या निवेदनाच्या प्रति मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री, पालकमंत्री,विभागीय आयुक्त,जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि रेणापूर तहसीलदारांना माहितीस्तव पाठविण्यात आल्या आहेत.




**लातूर तहसील कार्यालयाचे तहसीलदार सौदागर तांदळे यांच्या वाढदिवसानिमित्त संकीर्ण विभागाचे अव्वल कारकून शेख बाशीद यांनी पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या**

## 'छोटा' बुमराह मोदींच्या भेटीला! 'तो' एक क्लिक तुफान व्हायरल

टी-२० विश्वविजेत्या टीम इंडियाबरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज (दि. ४) दिल्लीतील लोककल्याण मार्गावरील त्यांच्या निवासस्थानी विशेष संवाद साधला. भारताचा स्टार गोलंदाज जसप्रीत बुमराहने पंतप्रधान मोदींसोबतच्या भेटीची झलक शेअर केली आहे. छोट्या बुमराहचा फोटो तुफान व्हायरल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबरील भेटीवेळी बुमराहची पत्नी संजना गणेशन आणि त्याचा मुलगा अंगद बुमराह हाही उपस्थित होता. पंतप्रधान मोदींनी बुमराह, संजना आणि त्यांचा मुलगा अंगद बुमराह यांच्यासोबत पोज दिली.

## संपादकीय....

# 'नीट'चा तिढा

न्यायालयीन आणि शासनाच्या पातळीवर येत्या काळात 'नीट' परीक्षेसंदर्भात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर होण्याची शक्यता असल्यामुळे वैद्यकीय अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्यांचे लक्ष त्याकडे लागून राहिले आहे; परंतु घडलेल्या प्रकारामुळे देशातील अत्यंत महत्त्वाच्या परीक्षेबाबतही आपली शिक्षणव्यवस्था आणि शासन किती बेजबाबदार आहे याचे पुनः दर्शन घडले आहे. 'नीट' सारख्या परीक्षेचा पेपर फुटतो आणि समाजमाध्यमांवर व्हायरल होतो, ही बाब अत्यंत लाजिरवाणी आहे.

देशातील वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी घेतल्या जाणाऱ्या 'नीट' या प्रवेशपूर्व परीक्षेला यंदा वादाचे ग्रहण लागले आहे. या परीक्षेचा वाद देशभरातील विविध राज्यांमधून चिघळत चालल्याचे दिसत आहे. आधी पेपरफुटीचा आरोप करून 'नीट'च्या निकालावर बंदी घालण्याची मागणी केली जात होती. त्यानंतर निकालात जाहीर केलेल्या टॉपर्स आणि ग्रेस मार्क्स पॉलिसीवर प्रश्न उपस्थित केले गेले. याप्रकरणी सुप्रीम कोर्टात अनेक याचिका दाखल केल्या असून त्यातील काही याचिकांवर सुनावणी झाली असली, तरी सर्व याचिकांवर ८ जुलै रोजी एकत्रित सुनावणी होणार आहे. ५ मे रोजी पार पडलेल्या 'नीट' परीक्षेस देशभरातील ४,७५० केंद्रांवर सुमारे २४ लाख उमेदवारांनी ही परीक्षा दिली. तथापि, या परीक्षेदरम्यान काही केंद्रांवर पेपर फुटल्याचा आरोप केला होता. त्यानंतर नॅशनल टेस्टिंग एजन्सीने या आरोपांचे खंडन करत कोणताही पेपर लीक झाला नसल्याचे स्पष्ट केले.

तथापि, राजस्थान, दिल्ली आणि बिहारमधून पोलिसांनी 'नीट' परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणात काही आरोपींना अटक केली. लोकसभा निवडणुकीच्या निकालादरम्यान ४ जून रोजी 'नीट' परीक्षेचा निकाल जाहीर झाला तेव्हा सर्वच विद्यार्थ्यांचे आणि शिक्षण क्षेत्रातील अनेकांचे डोळे विस्फारले. कारण, देशामध्ये सर्वोच्च काठीण्यपातळी असणाऱ्या स्पर्धा परीक्षांमध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांच्या बरोबरीने 'नीट'चा समावेश आहे. विशेष म्हणजे, यामध्ये निगेटिव्ह मार्किंग सिस्टीम आहे. त्यानुसार एक प्रश्न चुकल्यास विद्यार्थ्यांचे पाच गुण कमी होतात. असे असताना यंदा या परीक्षेमध्ये सुमारे ६७ उमेदवार टॉपर घोषित केले आणि त्यांना ७२० पैकी ७२० गुण मिळाले आहेत.

पैकीच्या पैकी गुण मिळवणाऱ्या या यादीतील ६ उमेदवार हरियाणातील फरिदाबादच्या एकाच केंद्रावरील आहेत. त्यामुळे साहजिकच याबाबत आश्चर्य व्यक्त झाले. तथापि, एनईटीकडून याच्या समर्थनार्थ असे सांगण्यात आले की, आमच्याकडून काही विद्यार्थ्यांना परीक्षेचा पेपर उशिरा मिळाल्यामुळे त्यांना त्यांची उत्तर सोडवण्याची क्षमता जाणून घेऊन ग्रेस मार्क दिले आहेत. सबब यंदा ७२० गुण घेणारे विद्यार्थी वाढले आहेत; परंतु या स्पष्टीकरणाने विद्यार्थ्यांचे समाधान झाले नाही.

दरवर्षी या परीक्षेचा निकाल १४ जून रोजी जाहीर केला जातो. असे असताना यंदा १० दिवस आधी निकाल जाहीर झाला. याबाबतही पेपर तपासणी लवकर झाल्यामुळे निकाल लवकर जाहीर केल्याचे सांगण्यात आले. हे स्पष्टीकरणही उमेदवारांना रुचले नाही. या सर्व गदारोळादरम्यान सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण आदेश देत ग्रेस मार्क मिळालेल्या १,५६३ विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा घेण्यात यावी, असे सांगितले. जे उमेदवार या परीक्षेस बसणार नाहीत त्यांना ग्रेस मार्कांशिवाय गुण देण्यात येतील, असे स्पष्ट केले आहे.

वैद्यकीय परीक्षेच्या जुन्या प्रक्रियेतील विसंगती दूर करण्यासाठी आणलेल्या नव्या प्रणालीवरही प्रश्नचिन्ह निर्माण होत असेल, तर मग यासाठी आणखी काही पर्याय शोधण्याची गरज आहे का. असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत. असेही देशातील विविध राज्ये या परीक्षा पद्धतीबाबत नाराजी दर्शवत आहेत. या परीक्षेत भारतीय भाषांत बसलेल्या विद्यार्थ्यांना न्याय मिळत नसल्याचा आरोप होत आहे. तामिळनाडूसह दक्षिण भारतातील अनेक राज्ये विद्यार्थ्यांची नवीन परीक्षा पद्धतीमुळे गैरसोय होत असल्याचा आरोप करत आहेत. वैद्यकीय महाविद्यालयात तामीळ भाषिक विद्यार्थ्यांना कमी जागा मिळत असल्याचा आरोप स्टॅलिन सरकारने केला होता. त्यामुळे पेपरफुटी आणि वाढीव गुणांमधील अनियमिततेबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांवर तोडगा काढण्याची गरज असताना प्रादेशिक भाषांच्या उमेदवारांनाही न्याय मिळायला हवा.

# विद्यार्थ्यांतून शिधायोजनांवर विसंबून राहणारा वर्ग घडवायचा आहे का?

देशात नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करण्यात आले असतानाच महाराष्ट्र सरकारने काही पावले उचलली आहेत. त्यानुसार राज्याच्या शिक्षण मंडळाने इयत्ता बारावीपर्यंतच्या अभ्यासप्रणालीत काही बदल केले असून नव्या आराखड्यासंदर्भात नागरिकांना काही आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे प्रारूप बघितल्यास त्यात धर्मनिरपेक्षता व सर्वधर्मसमभाव याचा अभाव दिसून येतो तर दुसऱ्या बाजूने त्या त्या राज्यांतील मातृभाषा व स्थानिक भाषेला प्राधान्य देत असताना इंग्रजीला ऐच्छिक सदरात टाकण्यात आले. किमान पाचवीपर्यंत शिक्षणाचे माध्यम मातृभाषा ठेवण्यात आले. परंतु नववी ते बारावीपर्यंत कोणते माध्यम असावे यावर संदिग्धता कायम आहे. इंग्रजीला निकडीची भाषा न करता ऐच्छिक करणे हे विद्यार्थ्यांचा बौद्धिक स्तर व त्यांची क्षमता अधिक संकुचित करणारे ठरू शकते.

शालेय अभ्यासक्रम हा रोजच्या जीवनाशी, मानवी संस्कृतीशी व रोजगाराशी सबंधित असला पाहिजे. वैज्ञानिक शोधांचा उपयोग मानवी जीवनाच्या कल्याणासाठी व्हावा यासाठी वैज्ञानिकांची धडपड सुरू असते. मात्र अभ्यासक्रम वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित असावा यासाठी आग्रही राहण्याऐवजी सरकार विद्यार्थ्यांच्या मनात भेदभाव पेरण्यास अधिक उत्सुक असल्याचे दिसते. अभ्यासक्रमातून द्वेषाचा प्रसार करण्याचे प्रयत्न गेल्या काही वर्षांपासून सुरू आहेत. असे दुभंग निर्माण करणारे विचार कोवळ्या मनांवर बिंबवून सत्ताधाऱ्यांना व त्यांच्याशी सबंधित संघटनांना काय साध्य करायचे आहे? धर्माच्या नावाने देश अस्थिर करण्याचा डाव असला तरी तो अधिक काळ टिकाव धरणार नाही, हे सत्ताधाऱ्यांनी आता तरी लक्षात घेतले पाहिजे.

अलीकडेच शिक्षण मंडळाने भाषा या विषयात मनाचे श्लोक आणि भगवद्गीतेतील काही अध्यायांचा समावेश केला. मूल्ये आणि स्वभाववृत्ती या घटकात तर थेट मनुस्मृतीमधील काही श्लोकांचा समावेश करण्यात आला. इतर धर्माच्या मूल्यांना मात्र कोणतेही स्थान देण्यात आलेले नाही. संस्कृतच्या उदात्तीकरणासाठी अनेक उपक्रम आहेत, परंतु विविध अभिलेख, शिलालेख व लेणींत अंकित असलेल्या ऐतिहासिक पाली प्राकृत भाषेचा विसर पडलेला दिसतो. याला विसराळूपणा म्हणायचे की धूर्तपणा!

मनुस्मृतीचा उदाहरणापुरता तरी उदोउदो कशासाठी?

देशात भारतीय संविधान लागू झाल्यानंतर विषमता व वर्णवादी प्राचीन जुलमी कायदे कालबाह्य झाले. मनुस्मृतीला बहुसंख्य समाजाचा विरोध आहे. कारण यात बहुसंख्याकाना सामाजिक व मानसिक गुलाम करण्याचे षड्यंत्र रचलेले आहे. म्हणूनच भारताच्या संविधानकर्त्यांनी या पुस्तकाचे जाहीररीत्या दहन केले होते. आधुनिक भारतात मनुस्मृतीचे नाव घेणेसुद्धा अयोग्य मानले जात असतानाही पुरोगामी प्रतिमा असलेल्या महाराष्ट्रात विषमतावादी मनुस्मृतीचे धडे शालेय शिक्षणात समाविष्ट करण्याची हिंमत करणे हे महाराष्ट्राच्या पुरोगामित्वाला कचराकुंडीत टाकण्यासारखेच आहे. खरे तर उदाहरणासाठीदेखील मनुस्मृतीचा उल्लेख करण्याची गरज नव्हती, परंतु वर्णवादी संस्कृतीचा गर्व बाळगून संधीची वाट पाहणाऱ्या घटकांना कोण रोखणार हा प्रश्न आहे.

भारताचा इतिहास मग तो प्राचीन असो वा मध्ययुगीन तो पुराव्यांवर आधारित असला पाहिजे. वि. दा. सावरकर यांनीसुद्धा हे मान्य केले आहे. त्यांच्या 'सहा सोनेरी पाने' या पुस्तकात भारताच्या इतिहासाचा आरंभ हा गौतम बुद्धांच्या काळापासून होतो, असे म्हटले आहे. 'सिंधूघाटी सभ्यता'सुद्धा प्रत्यक्ष पुराव्यांवर उभी आहे. म्हणून कोणताही ऐतिहासिक आधार नसलेल्या घटनांचा इतिहास म्हणून अभ्यासक्रमात समावेश करणे हे वास्तवाशी प्रतारणा करण्यासारखेच आहे.

सरकारी व खासगी शाळांच्या अभ्यासक्रमाची भाषा समान का नाही?

नव्या शैक्षणिक धोरणानुसार केवळ राज्य शासनातर्फे चालणाऱ्या सरकारी शाळांमध्ये इंग्रजी भाषेला तिलांजली (तिसरी ऐच्छिक भाषा) देत राज्याच्या (मराठी) भाषेव्यतिरिक्त दुसरी एक देशी भाषा अनिवार्य करण्यात आली. तर सर्व विषय त्या राज्याच्या मुख्य भाषेत शिकविले जातील, असा निर्णय घेण्यात आला. आश्चर्याची बाब म्हणजे हे बंधन खासगी संस्थांतर्फे चालविल्या जाणाऱ्या शाळेत नसून तिथे सर्व विषयांच्या भाषेचे माध्यम म्हणून इंग्रजीला मुभा देण्यात आली आहे. हा दुजाभाव कशासाठी? ग्रामीण व शहरी भागांत राहणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांनी इंग्रजी शिक्षणात कच्चेच राहावे यासाठी ही तरतूद तर नाही ना, अशी शंका येते. खासगी शाळांचे महागडे शिक्षण गरिबांना परवडणारे



नसल्यामुळे सरकारी शाळांशिवाय दुसरा पर्याय नसतो. अशा स्थितीत भविष्यात भाषिक, सामाजिक व आर्थिक दरी वाढवून गरीब व श्रीमंत असे दोन भारत निर्माण करावयाचे आहेत का, असा प्रश्न पडतो.

मातृभाषेचा अभिमान पण इंग्रजीला विरोध कशासाठी?

प्रत्येकाला आपल्या मातृभाषेचा अभिमान असतो. परंतु मातृभाषेतील शिक्षणामुळे रोजगाराच्या संधीची उपलब्धता मर्यादित राहते, असे अनेकांचे म्हणणे आहे. इंग्रजी भाषा ही जागतिक भाषा आहे. इंग्रजी भाषेच्या माध्यमातून सरकारी व खाजगी संस्थामध्ये अभियांत्रिकी, संगणक, कृत्रिम बुद्धिमत्ता व प्रबंधनाच्या क्षेत्रात रोजगाराच्या संधी देशात व विदेशात प्राप्त होत असतात. अशा परिस्थितीत इंग्रजीत संवाद साधता येत नसल्यामुळे व कुशल संभाषण कौशल्यांअभावी सरकारी शाळेतील विद्यार्थी रोजगाराच्या संधींना मुकतील याचे भान धोरणकर्त्यांकडे असायला हवे.

अभ्यासक्रमात संविधानाचा समावेश का नाही

नव्या अभ्यासक्रमात धार्मिक शिक्षणाच्या माध्यमातून पुराणे, गीता अध्याय, आत्मज्ञानयोग, भक्तियोग, कर्मयोग हे शिकविण्यात येणार आहेत. खरेतर जबाबदार नागरिक बनविण्याच्या प्रक्रियेमध्ये भारतीय संविधानाचे स्थान अधोरेखित करण्यात आले आहे. भारतीय संविधानाची ओळख विद्यार्थ्यांना पहिल्या वर्गापासूनच करून देणे गरजेचे आहे. आपले अधिकार व कायद्याच्या मूल्यांची जाणीव करून देत सुजाण व कर्तव्यतत्पर नागरिक घडविणे हे शिक्षण मंडळाचे कर्तव्य आहे. परंतु त्याबाबत नव्या अभ्यासक्रमात काहीही प्रयत्न दिसत नाहीत.

संविधान अंमलबजावणीच्या ७० वर्षांनंतर लागू होत असलेल्या नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील अभ्यासक्रमात धर्मनिरपेक्षतेचे कांगोरे गडद धुक्यामध्ये लपवून विषमतावादी पूर्वगौरववादाचे विचार शालेय विद्यार्थ्यांवर बिंबविणे हे अनाकलनीय आहे. या बदलामुळे गरीब वर्गातील युवक स्पर्धेत टिकाव न धरता तो केवळ लेबर इंडस्ट्रीचा भाग होईल. त्यांनी शासकीय शिधा योजनांवर अवलंबून राहणारा परावलंबी वर्ग होऊ नये यासाठी नियोजनकर्त्यांनी प्रयत्न केले पाहिजेत. या शैक्षणिक धोरणातून असमानतेचे अनेक घटक व त्यातून होणाऱ्या परिणामांची फलश्रुती स्पष्ट दिसत असली तरी त्याला विरोध दर्शविणाऱ्या नागरी समाजाची क्षमता कमी झाली आहे. मतमतांतरे प्रगट करण्याऐवजी ते मूकदर्शकाच्या भूमिकेत अधिक दिसताहेत. भारतीय मानसिकतेत झालेला हा बदल कशामुळे होत आहे याचा संशोधनात्मक अभ्यास व्हावयास हवा.

# घोषणांचा पाऊस, अंमलबजावणीचा दुष्काळ!

राज्याच्या प्रत्येक अर्थसंकल्पागणिक शेतकऱ्यांसाठी नवनव्या योजनांची घोषणा होते, मात्र कर्ज आठ लाख कोटींवर गेले असताना घोषणांच्या पूर्ततेसाठी निधी कुठून आणणार? तुषार गायकवाड,'संपर्क' या लोककेंद्री कारभारासाठी काम करणाऱ्या संस्थेचे सदस्य भाजपला केंद्रात एक हाती दहा वर्षे तर राज्यात सुमारे साडेसात वर्षांची सत्ता मिळाली. महाराष्ट्रात तर डबल इंजिन सरकार! २०१४-२०१९ ही पाच वर्षे तर भाजपला राज्यातील शेतकऱ्यांचा विश्वास जिंकण्याची सुवर्णसंधी होती. पण त्यांच्या अनेक घोषणा केवळ कागदावरच राहिल्या. २०१४ च्या भाजपच्या जाहीरनाम्यात महाराष्ट्रातील महिलांसाठी 'माहेरचा आधार' पेन्शन योजना तसेच, वयोवृद्ध शेतकऱ्यांसाठी 'अन्नदाता आधार योजना' अमलात आणण्याचे आश्वासन दिले होते. काय झाले या योजनांचे? आश्वासन न पाळणे, योजनांची अंमलबजावणी नीट न करणे, आयात-निर्यात धोरणाबाबत केंद्र सरकारचा हेकेखोरपणा, त्यात महाराष्ट्र राज्याचा विचार नसणे यामुळे राज्य सरकारवर शेतकऱ्यांचा विश्वास राहिला नाही, हे लोकसभा निवडणूक निकालातून अधोरेखित झाले. भाजपची ओळख गेल्या १० वर्षांत आश्वासने, घोषणा पूर्ण न करणाऱ्यांचा, जुमलेबाजांचा पक्ष अशी झाली आहे. याचे अनेक दाखले देता येतील.२०१७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान ही कर्जमाफी योजना आणली गेली. अंमलबजावणीपासूनच या योजनेत असंख्य त्रुटी होत्या. सहा वर्षे लोटली, तरी त्या दूर झालेल्याच नाहीत. पात्र शेतकऱ्यांना लाभ मिळाला नाहीच. २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तेव्हाचे अर्थमंत्री फडणवीस यांनी या योजनेतल्या वंचित शेतकऱ्यांना लाभ देण्याची घोषणा केली. मात्र तसे शासकीय आदेश अद्याप निघालेले नाहीत. त्याच अधिवेशनात बोगस बियाण्यांमुळे होणारी फसवणूक, लूट व आत्महत्या या बाबत आमदारांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर या संदर्भात राज्य सरकार नवा कायदा करणार असल्याचे आश्वासन फडणवीसांनी दिले. तेही अद्याप पूर्ण करण्यात आलेले नाही.मराठवाडा वॉटर ग्रिडची स्थापना, हीदेखील अशीच एक योजना. महाराष्ट्र भाजपच्या २०१९ च्या जाहीरनाम्यात ती होती. हा नदीजोड प्रकल्पाइतकाच महत्त्वाकांक्षी प्रकल्प होता. ४ ऑक्टोबर २०१६ च्या मंत्रिमंडळ बैठकीत अंदाजे ३४ हजार कोटी रुपयांच्या मराठवाडा वॉटर ग्रिड प्रकल्पास मंजुरी दिली गेली. मराठवाड्यातील एकूण ११ जलाशय तसेच उजनी जलाशयातून जलवाहिनी टाकल्यानंतर त्यातून पिण्याचे तसेच उद्योग व कृषी क्षेत्रासाठी पाणी देता येणार असल्याचे सांगितले गेले. मात्र केंद्राच्या जलशक्ती मंत्रालयाने पिण्याच्या पाण्याशिवाय इतर पाण्यासाठी निधी देता येणार नाही, असे स्पष्ट केले. दरम्यान, राज्य सरकारने इस्रायलच्या मेकारोटा डेव्हलपमेंट ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीशी करार केला होता. जलशक्ती मंत्रालयाच्या भूमिकेनंतर मेकारोटा कंपनीकडून विविध सहा प्रकल्प अहवाल मागवले गेले. प्रकल्पात १० टक्के बदल करून राज्याने पुन्हा परवानगी दिली. प्रकल्पाच्या निविदा २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी निघाल्या. निवडणुकीनंतर मविआ सरकारचे अर्थमंत्री अजित पवार यांनी हा प्रकल्प अव्यवहार्य ठरवून निधी नाकारला. ते सरकार पाडून स्थापन करण्यात आलेल्या महायुती सरकारच्या २०२२ सालच्या 'पंचामृत' अर्थसंकल्पात अर्थमंत्री फडणवीस यांनी सदर प्रकल्पातून उद्योग आणि कृषी पाणीपुरवठा काढून टाकत केवळ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याइतपत तो मर्यादित केला. तरीदेखील केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने निधी दिला नाही. केंद्रीय अर्थसंकल्पातून इतका मोठा निधी देता येत नाही. केंद्राच्या जलजीवन मिशनमध्येही यासाठी तरतूद नाही. त्यामुळे जागतिक बँकेचे कर्ज घेऊन राज्यानेच हा प्रकल्प राबवावा, असा सल्ला केंद्राने दिला. थोडक्यात, 'डबल इंजिन' असूनदेखील गेली आठ वर्षे फक्त आश्वासने व घोषणाच सुरू आहेत.आयात-निर्यातीच्या धोरणात तर राज्याच्या डबल-ट्रिपल इंजिन सरकारच्या प्रस्तावाचा विचार केंद्र अजिबातच करत नाही. केंद्र सरकारने कांद्याच्या दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी ४० टक्के



निर्यात शुल्क लागू केले. तेव्हा राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सरकारने सरसकट ३०० रुपये प्रति क्विंटल अनुदान देण्याचे जाहीर केले. नंतर, आधीचा निर्णय फिरवत केवळ २०० क्विंटलच्या मर्यादेत ३५० रुपये प्रति क्विंटल अनुदान जाहीर केले. त्यानंतर जवळपास १५ दिवसानंतर तसा अधिकृत शासन निर्णय काढला. सातबाऱ्यावर पीकपाणी नोंद आवश्यक असण्याची अट घालून लाभार्थी शेतकऱ्यांची संख्या नगण्य केली. सहा महिने झाले, तरीही पात्र कांदा उत्पादकांना अनुदान दिले नाही. जागतिक बाजारपेठेत कांद्याची मागणी वाढलेली असताना केंद्राने निर्यात वाढवण्याऐवजी निर्यात शुल्क वाढवले. ऐन लोकसभा निवडणुकीच्या काळात केंद्राने दोन हजार मेट्रिक टन पांढरा कांदा निर्यात करण्याचे परिपत्रक काढले. हा कांदा गुजरातमधील मुंद्रा पोर्ट, पिपावाव पोर्ट आणि न्हावा-शेवा/ जेएनपीटी पोर्टवरून निर्यात केला गेला. विशेष म्हणजे ही निर्यात एनसीएलद्वारे न करता थेट निर्यातदारांकरवी केली गेली. शिवाय महाराष्ट्र कांदा उत्पादकांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली गेली. 'एक देश एक कर', 'एक देश एक निवडणूक' अशा फसव्या संकल्पनांचा धुरळा उडवायचा आणि निर्यातीचे धोरण मात्र प्रत्येक राज्यात वेगवेगळे. असे निव्वळ स्वार्थी वर्तन. केंद्र व राज्याचा समन्वयच नाही. इथेही राज्य सरकारकडून फक्त घोषणा व आश्वासनेच दिली गेली. केंद्रातील नेते राजकीय प्रचारात डबल इंजिन, ट्रिपल इंजिन वगैरे शब्दप्रयोग करतात. पण जनतेला लाभ शून्य. अगदी, गेल्याच आठवड्यात राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात ट्रिपल इंजिन राज्य शासनाने दूध उत्पादक शेतकऱ्यांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी प्रतिलिटर पाच रुपये अनुदान देण्याचा निर्णय जाहीर केला. या अनुदानास पात्र होण्याच्या अटी बघितल्या तर संपूर्ण राज्यात केवळ २५ टक्के, त्यातही कोल्हापूर जिल्ह्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांनाच या अनुदानाचा लाभ होतो. त्याचे श्रेय गोकुळ दूध संघाच्या नियोजनबद्ध यंत्रणेस आहे. दुसरीकडे, लोकसभेत एनडीएला १७ सदस्य निवडून देणाऱ्या राज्याच्या निर्णयाची दखलही न घेता केंद्राने आयात शुल्क कमी करून १० हजार टन दूध पावडर आयात करण्याचा निर्णय घेतला. यामुळे देशांतर्गत बाजारपेठेतील दूध पावडरच्या दरात तीव्र घसरण होईल. साहजिकच, यामुळे दुधाचे दर कमी केले जातील. वास्तविक केंद्र सरकारने भेसळयुक्त दूध व भेसळयुक्त दूध पावडर तयार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करून बाजारातील दुधाची कृत्रिम वाढ व टंचाई निर्माण करण्यास पायबंद घातला पाहिजे. त्याऐवजी, दूध पावडर आयात करून राज्यातील शेतकऱ्यांच्या आधीच तोट्यात असलेल्या दुग्ध जोडधंद्याला आणखी तोट्यात ढकलण्याचा प्रकार केला आहे. त्यामुळे, राज्य शासनाची अनुदानाची मलमपट्टी, जखम रेड्याला व मलम पखालीला अशा स्वरूपाची आहे.मविआ सरकारने त्यांच्या अडीच वर्षांच्या अल्प सत्ताकाळात पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये अनुदान देणारी 'महात्मा फुले कर्जमाफी व प्रोत्साहन योजना' अमलात आणली होती. २०२०च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मविआ सरकारचे अर्थमंत्री अजित पवार यांनी त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद केल्याची घोषणा विधानसभेत केली. पुढे राज्यात सत्ताबदल झाल्याने योजनेला खीळ बसली. राज्यातील सुमारे ४० टक्के पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदानाची ५० हजार रुपये रक्कम मिळालेली नाही. मविआचे तेव्हाचे अर्थमंत्रीच आता महायुतीतही अर्थमंत्री आहेत. त्यांचेच सहकारी मंत्री हसन मुश्रीफ म्हणतात, 'नियमित पीक कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रोत्साहनपर अनुदान राज्य सरकारने मंजूर केले. परंतु सहकार खात्याचे अधिकारी आणि लेखापरीक्षकांच्या उदासीनतेमुळे ते रखडले आहे.' - अमंलबजावणीकडे इतके दुर्लक्ष होत असेल तर सरकार केवळ लोकप्रिय घोषणा व जाहिरातबाजी करते, असेच चित्र दिसणार. सरकारने शेतकऱ्यांना ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांसाठी मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र आधीच एक लाख १० हजार कोटींची वित्तीय तूट व २० हजार कोटींची महसुली तूट असताना नव्याने जाहीर केलेल्या योजनांसाठी निधी कुठून आणणार, याचे उत्तर अर्थसंकल्पात सापडत नाही.

# फणसाच्या बियांमध्ये दडलंय काय?

फणस म्हणजे इंग्रजीत जॅकफ्रुट! रसाळ किंवा स्वच्छ पिवळा आणि चवीला खास असणाऱ्या या फळाचं मला कायम कुतूहल वाटत आलंय. बऱ्याच फळझाडांच्या बियांदेखील आहारात समाविष्ट केल्या जातात. फणस त्यापैकीच एक! आजच्या लेखात त्याचबद्दल थोडं जाणून घेऊ!

कोकणात सुट्टीत गेलो की, आंबे, काजू आणि फणस यांची रेलचेल असे. सकाळ संध्याकाळ फक्त आंबे, करवंद, फणस यांचा घरभर घमघमाट असायचा. खेळायला जाताना आजोबांना फणसाचा अंदाज घेताना पाहिलं की, समजायचं आज फणसाचे गरे! खेळून आलो की, आपसूक पावलं मागच्या पडवीत वळायची (गावच्या घराचे चार भाग– अंगण, बाहेरची खोली, माजघर, देवघर आणि मागची पडवी. मागच्या पडवीत आम्हा नातवंडांचा कल्लोळ असायचा) आम्ही खेळून आलो की आजी प्रत्येकाला हातात छोटी डिश देत त्यात गरे द्यायची. कापा आणि बरका – कोणाला कोणते गरे हवेत ते विचारात, हा साधारण सोहळाच सुरु असायचा. फणसाच्या गऱ्यांवर पाणी पिऊ नका मला कायम कापा फणसाचं आकर्षण असे. एक तर ते गरे स्वच्छ दिसत आणि खायला पण सुटसुटीत! हळूहळू खा नाहीतर पोटात दुखेल. आजी सांगत राहायची कोणी चुकून पाणी प्यायला तर आजी बजावायची गऱ्यांवर पाणी पिऊ नये बाळा; पोटात दुखेल आणि गरे खाऊन आठूळं धुवून ठेवा बाहेरच्या भांड्यात असा एक सूचनावजा दंडक देखील असे. आम्ही हात धुताना आठूळं धुवायचो – ती गुळगुळीत आठूळं धुताना त्यांचं आरपार दुधट कवच मजेमजेत काढायला मजा येई. हे करताना कधी कधी आठूळं निसटायची. या सगळ्याची मला कायम गम्मत वाटायची. त्या किंवा पुढच्या आठवड्यात आजी याच आठूळ्या



किंवा आठव्या भाजून किंवा उकडून खायला देई. खमंग आणि दैवी! बाहेरून काटेरी, आतून रसाळ पुढे गावावरून फणस घरी येत आणि आठव्या वेगळ्या येत. मला रसभरीत लहानखुऱ्या बरक्या फणसाच्या गऱ्यापेक्षा कायम कापा गऱ्याचं आकर्षण असे आणि आठूळ कधी अशीच किंवा भाजी म्हणून खायला कोण आनंद होई! उन्हाळा सुरु होताना कच्च्या फणसाची भाजी आणि पावसाळ्याआधी साठवलेल्या आठवल्यांचे विविध प्रकार आपल्याला पाहायला मिळतात. फणस दिसायला अजस्त्र –बाहेरून काटेरी आतून रसाळ, रुचकर!

आहारशास्त्रामध्ये फणस त्यामानाने कमी गवगवा केलं जाणारं फळ. त्याच्या अजस्त्र आकारामुळे आणि खाण्याआधी साफ करण्याच्या पद्धतीमुळे असेल. आजच्या झटपट जीवनशैलीत तितका सहज घराघरात दिसत नाही. आणि भारतीय फळांबद्दल त्यातून महाराष्ट्रातील फळांबद्दल आपल्याला माहिती असायलाच हवी. फणसाबद्दल काही जाणून घ्या, आधी जाणून घेऊ फणसाच्या बियांबद्दल!

स्नायूंच्या बळकटीसाठी फणसाच्या बियांमध्ये ज्याला आठूळ किंवा आठव्या असं म्हटलं जातं यात भरपूर मॅग्नेशिअम, लोह आणि प्रथिने असतात. लहान मुलांच्या वाढीसाठी पोषक आणि विशेषतः स्त्रियांच्या आरोग्यासाठी उत्तम अशा फणसाच्या बिया उकडून, भाजून खाल्ल्यास शरीरातील स्नायूंना उत्तम बळकटी मिळते. मासिक पाळीदरम्यान नियमित आठव्या खाल्ल्याने अनेक स्त्रियांची पोटदुखी कमी व्हायला मदत होते. केसगळती, त्वचेचे विकार कमी होण्यासाठी आठव्या खाणे आरोग्यदायक मानले जाते. यात असणारे अ जीवनसत्त्व डोळ्याच्या आरोग्यासाठी देखील उत्तम मानले जाते. तसेच यात असणारे लोह ॲनिमियाचे प्रमाण कमी करू शकते.

मधुमेहींसाठीही उत्तम मधुमेह असणाऱ्यांनीदेखील फणसाच्या बिया आवर्जून आहारात समाविष्ट कराव्यात. बियांमध्ये असणारी सॅपोनीन, लिग्नन, आर्टोकार्पीन, जॅकनीन यासारखी द्रव्ये रक्तामिसरण, पेशींचे आरोग्य, हृदयाच्या आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. अलीकडे दुधाला पर्याय म्हणून याच बियांची पावडर वापरली जाते. केवळ उपवासाचे पदार्थ म्हणून नव्हे तर ज्यांना ग्लूटेन पचत नाही त्यांच्यासाठी या बियांचे पीठ आहारात सहजी समाविष्ट केले जाऊ शकते.

क जीवनसत्त्व आणि तंतुमय पदार्थ नेहमीच्या आहारात थालीपीठ, वेगेवेगळ्या प्रकारच्या भाज्या, पोळी अशा स्वरूपात हे पीठ वापरले जाते. फणसाच्या बिया भाजल्याने त्यातील प्रथिनांचा अंश आणखी वाढतो त्यामुळे भाजलेल्या बियांचे पीठ जास्त पोषक मानले जाते. अनेक ठिकाणी फणसाच्या गऱ्यांना मोड आणून त्यानंतर ते भाजले जातात. या प्रक्रियेमध्ये गऱ्यातील क जीवनसत्त्व आणि तंतुमय पदार्थांचे प्रमाण उत्तम असते आणि या गऱ्यांपासून तयार केले जाणारे पीठ किंवा पावडर अनेक प्रथिनांच्या पावडरमध्ये देखील वापरली जाते. त्वचाविकारांमध्ये वापरल्या जाणाऱ्या अनेक औषधांमध्ये गऱ्यांचा अर्क किंवा पावडर हमखास वापरली जाते.

पचनासाठी उत्तम फणसाच्या बियांमध्ये असणाऱ्या तंतुमय पदार्थांच्या उत्तम प्रमाणामुळे त्या पचनासाठी उत्तम मानल्या जातात. तसेच शरीरातील अतिरिक्त चरबीचे प्रमाण वाढू नये यासाठी फणसाच्या बिया आहारात जरूर समाविष्ट कराव्यात. भूक पटकन भागविणाऱ्या फणसाच्या बिया अलीकडे वेगेवेगळ्या उत्पादनामध्ये वापरल्या जातात. पूर्णपणे वनस्पतीजन्य आहाराकडे कल असणाऱ्या बहुतांशी विगन लोकांसाठी फणसाच्या बिया आवडतं खाणं आहे. हे झालं बियांबद्दल –पुढच्या लेखात जाणून घेऊया गऱ्यांबद्दल!

## साजूक तुपात बनवा गव्हाच्या पिठाचा लुसलुशीत हलवा



पावसाळा असो वा हिवाळा जर तुम्हाला काहीतरी गरम, गोड आणि चविष्ट खावेसे वाटत असेल तर तुम्ही गव्हाच्या पिठाचा शिरा करून खाऊ शकता. साजूक तुपात बनवलेला हा हलवा खूप चविष्ट तर लागतोच तसाच आरोग्यासाठी देखील चांगला असतो. रवा आणि गाजर हलव्यापेक्षा पिठाचा हलवा जास्त फायदेशीर आहे. हा हलवा खाल्ल्याने तुमची प्रतिकारशक्ती मजबूत होईल आणि तुम्हाला सर्दी–खोकल्यापासून आराम मिळेल. तर चला जाणून घेऊया पिठाचा शिरा कसा तयार करायचा?

गव्हाच्या पिठाचा शिरा बनवण्याची कृती

पिठाचा शिरा बनवण्यासाठी गव्हाचे पीठ घ्यावे लागते. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही कोणतेही मल्टी ग्रेन पीठ देखील वापरू शकता.

कढईत तुपात पीठ भाजून घ्या. पीठ थोडेसे ओले झाले की समजून घ्या की तुम्ही पुरेसे तूप घातले आहे. जर आपण मोजमाप बद्दल बोललो तर आपण २ कप पिठात १ कप तूप घालू शकता.यह वीनर्स नकली दांतों से ३०० गुना बेहतर है! और कीमत बहुत सस्ती है और जानें आता सतत ढवळत असताना मंद आचेवर पीठ भाजून घ्या आणि हलके सोनेरी होईपर्यंत भाजा. पीठ भाजल्यावर आणि सुगंध येऊ लागल्यावर त्यात २ कप गरम पाणी घाला आणि पातळ, ढेकूळ नसलेले असे तयार करा. कढईत सतत ढवळत राहा. आता त्यात आवडीप्रमाणे २ कप साखर किंवा गूळ एकत्र करून घाला. वर चिरलेले काजू, बदाम किंवा कोणताही ड्राय फ्रूट घालून १ चमचा तूप घालून गरमागरम सर्व्ह करा.

## पीएचडी बिझनेस डमिनिस्ट्रेशन मध्ये करिअर करा

:व्यवसाय प्रशासनातील डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी हा ३ ते ५ वर्षांचा पूर्णवेळ अभ्यासक्रम आहे. पीएचडी बिझनेस डमिनिस्ट्रेशन ही मुळात डॉक्टरेट पातळीची पदवी आहे ज्याचे उद्दीष्ट व्यवसाय तत्त्वांचे अत्यंत कुशल विश्लेषणात्मक समज असलेले लोक निर्माण करणे आहे. हा अभ्यासक्रम प्रमुख कामगिरी निर्देशक, व्यवस्थापनातील नवीन पद्धती, परिमाणात्मक आणि गुणात्मक तंत्रांशी संबंधित आहे.

पात्रता– इच्छुक उमेदवारांनी व्यवसाय प्रशासनाशी संबंधित विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी किंवा एम.फिल पदवी असणे आवश्यक आहे.

व्यवसाय प्रशासनात पीएचडीमध्ये प्रवेश घेण्यासाठी उमेदवाराला पदव्युत्तर पदवीमध्ये किमान ६०% गुण असणे आवश्यक आहे.



राखीव श्रेणीतील उमेदवारांसाठी ५% गुणांची सूट उपलब्ध आहे.

यासोबतच, उमेदवाराला प्रवेश परीक्षांमध्ये विद्यापीठाच्या दर्जाप्रमाणे गुण मिळवावे लागतात

प्रवेश प्रक्रिया– कोणत्याही उच्च विद्यापीठात पीएचडी व्यवसाय प्रशासन अभ्यासक्रमात प्रवेश घेण्यासाठी उमेदवारांना प्रवेश परीक्षेला बसणे आवश्यक आहे. प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर, वैयक्तिक मुलाखत असते आणि जर उमेदवारांनी त्यात चांगले गुण मिळवले तर त्यांना शिष्यवृत्ती देखील मिळू शकते.प्रवेश परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठातर्फे ऑनलाइन (स्काईप, गुगल मीट, झूम) किंवा ऑफलाइन विद्यार्थ्यांना युनिव्हर्सिटी कॅम्पसमध्ये कॉल करून मुलाखतीला उपस्थित राहण्यास सांगितले जाते.

## पावसाळ्यात थंडी असूनही हिवाळ्याप्रमाणे भूक का लागत नाही?

पावसाळ्यात सुद्धा हिवाळ्यासारखीच थंडी असते, मग जशी व जितकी भूक हेमंत–शिशिर ऋतुमध्ये लागते तशी ती प्रावृट्–वर्षा ऋतुमध्ये का लागत नाही? असा प्रश्न पडणे स्वाभाविकच आहे. तर यामागील आयुर्वेदाचा विचार समजून घ्यायला हवा

हिवाळ्यातील प्रबळ अग्नी हिवाळा व पावसाळा यांमध्ये वातावरणात गारवा असूनही पावसाळ्यात भूक का वाढत नाही, याचे स्पष्टीकरण महर्षी सुश्रुतांनी दिले आहे. हिवाळ्यात भूक वाढते ती घाम बाहेर फेकणारी त्वचेवरील सूक्ष्म रंध्रे (छिद्रे) बंद झाल्यामुळे, जी हिवाळ्यातल्या थंडाव्यामुळे संकोचतात. त्यामुळे या छिद्रांमधून घामावाटे शरीराबाहेर पडणारा अग्नी (उष्णता) हिवाळ्यात बाहेर न पडता शरीरातच आतल्या आत कोंडून अग्नी प्रबळ होतो आणि भूक व पचनशक्ती वाढते. भूक वाढते पण अन्नपचनात अडचणी पावसाळ्यात मात्र तशी स्थिती नसते. ज्या थंडाव्यामुळे अग्नी प्रज्वलित होऊन भूक व पचनशक्ती वाढते, तो थंडावाच मुळात या उभय ऋतूंमध्ये भिन्न–भिन्न असतो. हिवाळ्यातला थंडावा हा कोरडा असतो, तर पावसाळ्यातला ओला गारवासुद्धा त्वचेवरील सूक्ष्म रंध्रांचा संकोच करतो, त्यामुळे पावसाळ्यात सुद्धा काही प्रमाणात भूक वाढलेली दिसते, परंतु ती हिवाळ्याप्रमाणे स्वस्थ भूक नसते. असे का? तर पावसाळ्यातल्या त्या गारव्याला ओलाव्याची जोड असते. हवेतला ओलावा त्वचेची रंध्रे कोरड्या हवेप्रमाणे पूर्णतः संकोचू देत नाही, त्यामुळे भूक वाढल्यासारखी वाटते; मात्र व्यवस्थित लागत नाही आणि अन्नाचे पचनही नीट होत नाही.

ओलाव्याला गारव्याची जोड महर्षी सुश्रुतांच्या श्लोकावर भाष्य करताना सुश्रुतसंहितेचे भाष्यकार आचार्य डल्हण म्हणतात की, पावसाळ्याआधीच्या उन्हाळ्यातल्या कोरड्या हवेमुळे शरीरामध्ये वात वाढलेला असतो. कारण कोरडेपणा हा वाताचा प्रमुख गुण आहे. उन्हाळ्यात शरीरामध्ये जमत गेलेला तो वात पावसाळ्यात ओलाव्याला गारव्याची जोड मिळाल्याने प्रकुपित होतो, ज्याला 'शीतवात' असा शब्द त्यासाठी सुश्रुतांनी वापरला आहे. हा शीतवात म्हणजेच गारव्याची जोड मिळाल्याने बळावलेला वात शरीरातल्या अग्नीला प्रबळ न करता उलट अवरोधित करतो म्हणजे अग्नीला प्रज्वलित होण्यापासून अडवतो, ज्यामुळे भूक व पचनशक्ती मंदावते.ओलाव्यामुळे अग्निमांद्य याशिवाय, पावसाळ्यातल्या गारवा असला तरी अधुनमधून सूर्यदर्शन होत असते, ज्यामुळे घाम येत राहतो अर्थात घाम काढणारी रंध्रे बंद होत नाहीत आणि अग्नी (उष्णता) शरीरात कोंडला न जाता उलट बाहेर फेकला जातो व अग्निमांद्य होते. याशिवाय पावसाळ्यात शरीरामध्ये वाढलेला ओलावा (क्लिन्नता) अग्नीला प्राकृतरित्या प्रज्वलित तर होऊ देत नाही, उलट आपले पचनाचे कार्य व्यवस्थित करू न शकणारा असा विदाही बनवतो, ज्यामुळे अन्नाचे अपचन होऊन पित्ताचा त्रास वाढतो. पावसाळ्यात शरीर कमजोर होते या संदर्भात आयुर्वेद–शास्त्रकारांनी आणखी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे, तो म्हणजे हेमंत ऋतूमध्ये बलवान शरीरांमध्येच अग्नी प्रबळ होतो. हेमंत ऋतूमध्येच वातावरण व देहस्थिती अशी असते की, मानवाचे शरीर बलवान होते आणि या उलट पावसाळ्यामध्ये जरी वातावरणात गारवा असला तरी शरीर बलवान नसून उलट कमजोर झालेले असते. त्यामुळे वर्षा ऋतूमध्ये अग्नी मंद होतो, तर हेमंत ऋतूमध्ये निसर्गतः बल उत्तम असते, भूक वाढल्याने अन्नाचे व्यवस्थित पचन होते व शरीराचे बल अधिक वाढते आणि बल वाढले की, अग्नी अधिकाधिक प्रबळ होत जातो. वाढलेला वात आणि पित्तसंचय वर्षा ऋतूमध्ये आदान काळाचा प्रभाव असल्याने माणसाचे शरीर दुर्बल होते आणि या अवस्थेमध्ये अग्नी सुद्धा दुर्बल होतो, असेही अष्टाङ्गहृदय ग्रंथाचे भाष्यकार आचार्य हेमाद्री सांगतात. दुसरीकडे प्रावृट् ऋतूमध्ये तीनही दोषांचा प्रकोप होतो, तोसुद्धा अग्नीचे कार्य प्राकृत होऊ देत नाही. त्रिदोष प्रकोपामुळे अग्निमांद्य आणि अग्निमांद्यामुळे त्रिदोष प्रकोप असे हे दुष्टचक्र असते, ज्याच्या परिणामी भूक व पचनशक्ती मंदावते. एकंदर पाहता वर्षा ऋतूमध्ये पावसाळ्यातले ओलसर वातावरण, त्याला मिळालेली गारव्याची जोड, त्यामुळे शरीरामध्ये वाढलेला ओलावायुक्त थंड गुणांचा वात (थंडाव्यामुळे वाढलेला वात), दुसरीकडे पित्ताचा संचय,निर्बल शरीर, बल हिरावून घेणारा आदान काळ आणि सतत जलवर्षावामुळे शरीराची निष्क्रियता या सर्व कारणांच्या एकत्रित परिणामांमुळे अग्नी मंद होऊन भूक व पचनशक्ती कमजोर करतो.

## जाणून घ्या योगिनी एकादशीचे महत्त्व, पूजाविधी आणि महत्त्वाच्या वेळा

भगवान विष्णू आणि माता लक्ष्मी यांना वाहिलेली एकादशी म्हणजे योगिनी एकादशी. एकादशीच्या दिवशी भगवान विष्णू आणि माता लक्ष्मी यांची पूजा केल्याने सर्व अडथळे दूर होतात आणि आपल्या मनोकामना पूर्ण होतात. आषाढ महिन्यातील पहिली एकादशी म्हणजे योगिनी एकादशी होय. या दिवशी व्रत केल्याने जगातील सर्व प्रकारचे आनंद प्राप्त होतात. या दिवशी जर दानधर्म केला तर ८४ हजार ब्राह्मणांना अन्नदान केल्याचे पुण्यप्राप्त होते. योगिनी एकादशी केव्हा आहे, आणि या दिवशी कोणते शुभ योग साकारत आहेत, याची माहिती आपण घेऊ.योगिनी एकादशी केव्हा आहे?आषाढ महिन्यातील कृष्ण पक्षातील एकादशी ही भगवान विष्णूला वाहिलेली असते. या दिवशी योगिनी एकादशी साजरी करतात. योगिनी एकादशी २ जुलैला आहे. या दिवशी व्रत केला जातो आणि माता लक्ष्मीची पूजा केली जाते. याशिवाय काही विशेष उपाय ही केले जातात, जेणे करून आपल्या सर्व मनोकामना पूर्ण होतात.योगिनी एकादशीच्या मुहूर्तावर चार महत्त्वाचे योग साकारात आहेत. पवित्र हृदयाने या दिवशी व्रत केले तर जीवनात कधीही पैशांची कमतरता पडत नाही, त्यामुळे हे व्रत सर्वांनी करावे असे सांगितले जाते. एकादशी केव्हा सुरू होत आहे? योगिनी एकादशी तिथी १ जुलैला सकाळी १० वाजून १२ मिनिटांनी सुरू होत आहे.

## शेअर बाजार सुसाट! गुंतवणूकदारांना १.९५ लाख कोटींचा फायदा

मजबूत जागतिक संकेत आणि आयटी तसेच बँकिंग शेअर्समधील तेजीच्या जोरावर भारतीय शेअर बाजाराची गुरुवारी (दि.४) चौथ्या सत्रात विक्रमी कामगिरी कायम राहिली. सेन्सेक्सने आजच्या ट्रेडिंग सत्रात ८०,३९२ च्या उच्चांकाला स्पर्श केला. त्यानंतर तो ६२ अंकांच्या किरकोळ वाढीसह ८०,०४९ वर स्थिरावला. तर निफ्टीने २४,४०१ चा नवा उच्चांक गाठला आणि त्यानंतर तो १५ अंकांनी किरकोळ वाढून २४,३०२ वर बंद झाला.

शेअर बाजारातील ठळक मुद्दे सेन्सेक्सने आजच्या ट्रेडिंग सत्रात ८०,३९२ च्या नव्या उच्चांकाला स्पर्श केला.त्यानंतर सेन्सेक्स ६२ अंकांच्या किरकोळ वाढीसह ८०,०४९ वर बंद.

निफ्टीने आजच्या सत्रात गाठला २४,४०१ चा नवा उच्चांक.त्यानंतर निफ्टी १५ अंकांनी किरकोळ वाढून २४,३०२ वर बंद. आयटी, हेल्थकेअर प्रत्येकी १ टक्क्याने वाढले.

बँकिंग शेअर्समधील तेजीमुळे निफ्टी बँकचा ५३,३५७ चा उच्चांक नोंदवला.बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप प्रत्येकी ०.६ टक्क्यांनी वाढून बंद.सेन्सेक्स आणि निफ्टीने आज नवे शिखर गाठले. पण




त्यानंतर बाजारात प्रॉफिट बुकिंग दिसून आले. यामुळे दोन्ही निर्देशांक सपाट पातळीवर बंद झाले. गुंतवणूकदारांना एका दिवसांत १.९५ लाख कोटींचा फायदा बीएसई सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल ४ जुलै रोजी ४४७.३८ लाख कोटींवर पोहोचले. ३ जुलै रोजी रोजी ते ४४५.४३ लाख कोटी रुपयांवर होते. याचाच अर्थ इक्र सूचीबद्ध कंपन्यांच्या बाजार भांडवलात १.९५ लाख कोटी रुपयांची वाढ झाली. निफ्टी बँक नव्या शिखरावर क्षेत्रीय निर्देशांकांतील आयटी, हेल्थकेअर प्रत्येकी १ टक्क्याने वाढले. ऑटो आणि रियल्टीमध्येही काही प्रमाणात वाढ दिसून आली. बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप प्रत्येकी ०.६ टक्क्यांनी वाढून बंद झाले. दरम्यान, बँकिंग शेअर्समधील जोरदार तेजीमुळे निफ्टी बँक निर्देशांकाने आज ५३,३५७ चा उच्चांक नोंदवला. त्यानंतर निफ्टी बँक ५३,१०३ वर स्थिरावला. अर्थवार्ता– गेल्या सप्ताहात कोणते शेअर्स सर्वाधिक वाढले? आयटी शेअर्स तेजीत? सेन्सेक्सवर एचसीएल टेक, आयसीआयसीआय बँक, टाटा मोटर्स, सन फार्मा, टीसीएस, इन्फोसिस, कोटक बँक हे शेअर्स सर्वाधिक वाढले. तर एचडीएफसी बँक, बजाज फायनान्स, टेक महिंद्रा, एलटी, अल्ट्राटेक सिमेंट हे शेअर्स घसरले.

सेन्सेक्सवरील शेअर्स.इक्र निफ्टी ५० निर्देशांकाने आज २४,४०१ चा नवा उच्चांक गाठला. त्यानंतर निफ्टी २४,३०० च्या पातळीवर स्थिरावला. निफ्टीवर टाटा मोटर्स, एचसीएल टेक, आयसीआयसीआय बँक, सन फार्मा, टीसीएस हे शेअर्स १ ते ३ टक्क्यांपर्यंत वाढले. तर एचडीएफसी बँक, बजाज फायनान्स, अदानी एंटरप्रायजेस, विप्रो, टेक महिंद्रा हे शेअर्स १ ते २ टक्क्यांनी घसरले. आशियाई बाजारातही विक्रमी तेजी, कारण काय? आशिया बाजारातही आज तेजीचे वातावरण राहिले. जपानमधील मुख्य स्टॉक निर्देशांक गुरुवारी विक्रमी बंद उच्चांकावर बंद झाले. आज टॉपिक्स निर्देशांकाने विक्रमी उच्चांक गाठून ३४ वर्षांपूर्वीच्या त्याच्या मागील उच्चांकाला मागे टाकले. टॉपिक्स निर्देशांक ०.९२ टक्क्यांनी वाढून बंद झाला. याआधीच्या सत्रापूर्वी ते २९०० च्या उच्चांकावर गेला होता. निक्केई निर्देशांक ०.८२ टक्के वाढला. दोन महिन्यांच्या विक्रीच्या सपाट्यानंतर परदेशी गुंतवणूकदारांनी जूनमध्ये आशियाई शेअर्स मोठ्या प्रमाणावर पैसे गुंतवण्यास सुरुवात केली. कारण अमेरिकेतील महागाईची तीव्रता कमी झाल्यामुळे फेडरल रिझर्व्ह यावर्षी व्याजदरात कपात करेल अशी आशा निर्माण झाली आहे.

# प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार यांना फुले-आंबेडकर साहित्य पुरस्कार जाहीर खा.शरद पवारांच्या हस्ते रविवारी सातार्यात होणार वितरण

लातूर :– येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखेचे पहिले अधिष्ठाता (डीन) आणि विद्यापीठाच्या पहिल्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व महाराष्ट्रामध्ये वैचारिक साहित्याला वाहिलेल्या विचारशलाका या त्रैमासिकाचे संपादक प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांना सातारा येथील भारतीय भटके विमुक्त विकास व संशोधन संस्था व फुले–आंबेडकर साहित्य पंचायत सातारा यांच्या वतीने देण्यात येणारा २०२३–२४ चा फुले–आंबेडकर साहित्य पुरस्कार देण्यात येत असल्याची घोषणा भटक्या विमुक्त जमाती संघटनेचे अध्यक्ष,प्रसिध्द साहित्यिक माजी आ.पद्मश्री लक्ष्मण माने यांनी केली आहे.

सदरील पुरस्काराचे वितरण रविवार,दि.९ जुलै २०२४ रोजी सकाळी १० वाजता,शारदाश्रम जकातवाडी,सातारा येथे,पुरस्कार वितरण संस्थेचे अध्यक्ष खा.शरद वार यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी माजी खा.श्रीनिवास पाटील हे राहणार आहेत,असे सांगून या पुरस्कार वितरण समारंभाला उपस्थित राहण्याचे आवाहन माजी आ.लक्ष्मण माने यांनी केले.

प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार हे गेली ३८ वर्षे सातत्य व गुणवत्ता टिकवून विचारशलाका या नियतकालिकाचे संपादन करीत आहेत.राजर्षी शाहू महाराज,महात्मा ज्योतिबा फुले,आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर या विचारधारेचा आणि स्वातंत्र्य,समता,बंधुता,न्याय,लोकशाही,समाजवाद,धर्मनिरपेक्षता आदी मूल्ये आणि तत्वांचा तसेच भारतीय संविधान यांच्या प्रचार व प्रसाराचे कार्य डॉ.नागोराव कुंभार यांनी मराठवाड्यातील लातूरसारख्या शहरात राहून विचारशलाका चालवून समाज प्रबोधनाचे मोठे कार्य अत्यंत व्रतस्थवृत्तीने केलेले आहे.



त्यांनी समाजप्रबोधनाच्या दृष्टिने म.गांधींजींचे सामाजिक तत्वज्ञान,गांधीजींची सत्याग्रहाची संकल्पना, भ्रष्टाचारः स्वरुप व संदर्भ, डॉ.आंबेडकरांचे शैक्षणिक तत्वज्ञान, महाराष्ट्रातील धेय्यवादी तत्वचिंतक,सामाजिक कार्याच्या दिशा, विचारतरंग, तरुण मनाच्या लाटा आणि वळण आदी ग्रंथांचे लेखन केले असून,त्यांनी चिंतन एका कुलगुरुचे,शिक्षण विचार, महाराष्ट्रातील समाजचिंतन, सर्वस्पर्शी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि यशवंतराव चव्हाण आदी ५० ग्रंथांचे संपादन केलेले आहे.त्यांच्या मार्गदर्शनाखाली ५ विद्यार्थी एम फिल तर ११ विद्यार्थी पीएच.डी.पदवी संपादित झाले आहेत.

त्यांनी शासकीय व निमशासकीय विविध समित्यांमध्ये लोकोपयोगी कार्य केलेले आहे. त्यांनी राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य,महाराष्ट्र तत्वज्ञान परिषदेचे अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळाचे सदस्य, महाराष्ट्र राज्य दर्शनिक मंडळाचे सदस्य आणि पुणे येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या तत्वज्ञान अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून भरीव काम केलेले आहे.

ते महाराष्ट्र शासनाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा पहिला आदर्श शिक्षक पुरस्कार,आंतरराष्ट्रीय शिक्षण व व्यवस्थापन संस्था,दिल्लीचा उत्कृष्ठ प्राचार्य पुरस्कार,महाराष्ट्र फाउंडेशनचा ५०००० चा पुरस्कार आणि महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचा श.वा.किर्लोस्कर पुरस्कार या व इतर अनेक पुरस्कारांनी सन्मानीत आहेत.त्यांच्या या व्यापक कार्याची नोंद घेवून आम्ही सन २०२३–२४ च्या प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार यांना फुले–आंबेडकर साहित्य पुरस्कारासाठी त्यांची निवड केली असल्याचे माजी आ.लक्ष्मण माने यांनी म्हटले आहे.

# तहसीलदार यांच्या वाढदिवसानिमित्त लातूर शहर पूर्व भाग कृती समितीच्या वतीने वृक्षारोपण

लातूर :--- येथील लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीच्या वतीने आज दिनांक ४/जुलै /२४ रोजी दुपारी लातूरचे तहसीलदार मा सौदागर तांदळे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने लातूर तहसील कार्यालय परिसरात तहसीलदार यांच्या हस्ते वृक्षारोपण करून वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या या वेळी सौदागर तांदळे यांनी वृक्षारोपण करून वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्याच्या सामाजिक उपक्रमा बद्दल समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे व सचिव बाबासाहेब बनसोडे यांचे कौतुक करून वाढदिवसाच्या निमित्ताने वृक्षारोपण सारखे सामाजिक उपक्रम राबविने काळाची गरज असून वाढत्या शहरीकरण त्यातून होणारी वृक्ष कत्तल चिंताजनक असून कमी वृक्ष संख्येमुळे निसर्गाचा समतोल बिघडला आहे वृक्षांची लागवड काळची गरज असल्याचे मत व्यक्त करीत जास्तीत जास्त वृक्षारोपण करण्याचे नागरिकांना आवाहन केले या वेळी नायब तहसीलदार गणेश सरोदे, भीमाशंकर बेरुळे,वरिष्ठ कारकून प्रभारी पुरवठा अधिकारी बशीद शेख,पुर्व भाग कृती समितीचे अध्यक्ष दिपक गंगणे,सचिव बाबासाहेब बनसोडे मिराजगावे ,पत्रकार संतोष सोनवणे,नितीन चालक ,गौसुदिन शेख,संजय उदारे, प्रशांत शिंदे,श्रीकांत राऊत , विठ्ठल काळे इत्यादी उपस्थित होते



# चाकूर तालूक्यातील सरपंच, पं.स अधिकारी यांना निलंबित करावे, जिल्हा परिषद कार्यालयासमोर अविनाश वाघमारे यांचे आमरण उपोषण सुरु


लातूर :– महाराष्ट्र सरकार आणी केंद्र सरकार हे . शेतकऱ्यांच्या जिवनात काहीतरी अर्थिक बदल चांगला व्हावा म्हणून अनेक योजनेच्या माध्यमातून करोडो रुपयाचा निधी देत आहेत. परंतू या वरील तीन गावात चक्क शेतकऱ्यांना हाताशी धरून सर्व योजना कागदोपत्रीच दाखवून शासनाच्या तिजोरीची करोडो रुपयाची लुट चालू आहे. या पाच वर्षाच्या कालावधीत या तीन गावात एका–एका गावात १५० ते २००/२५० विहीर काही संपूर्ण काम झाल्याचे दाखवून अंतिम (बिल) पैसे उचलले आहेत आणी आता काही विहीरीचे काम चालू दाखवतात पण प्रत्यक्षात जागेवरती काहीच नाही सर्व ऑनलाईन कार्यक्रम चालू आहे.जनावरांना उण वारा पाऊस यापासून सुरक्षा व्हावी म्हणून सरकार गोठे देते परंतू या प्रत्येक गावात प्रत्यक्षात २० ते २५ गोठे दिसून येतील. या तीनही गावात घरकुल घोटाळा असाच मोठ्या प्रमाणात आहे खरे गरीब लाभार्थ्यांना घरकुल कमी प्रमाणात तर श्रीमंत लोकांना एकाच कुटुंबात परिवाराची कागदोपत्री विभागणी (फोड) दाखवून तेच एक घरकुल दाखवून चार चार घरकुलाचे पैसे उचलण्यात आले आहेत. शौचालयाचाही असाच घोटाळा आहे. शेतकऱ्यांना व मजूर वर्गाला बोलतात की, काम न करता तुम्हाला एकूण मंजूर रकमेच्या आरधे पैसे देतोत आणी आर्धे पैसे वरिष्ठ आधिकारी यांना द्यावे लागतात असे बोलून ही लुटालूट चालू आहे लाभधारकांनाही वाटते की काहीच न करता जर का आर्धे पैसे घरबसल्या मिळत असतील तर मग बरंच आहे म्हणून तेही या घोटाळ्यात सहभागी होत आहेत हा करोडो रुपयाचा घोटाळा करण्यात गटविकास आधिकारी, संबंधित अभियंता व इतर संबंधित आधिकारी, गावचे सरपंच, ग्रामसेवक, रोजगार सेवक आणी तीवघाळ सरपंच बाईचा मुलगा यांच्या संगणमताने सर्रास चालू आहे आणी आपल्या वरिष्ठ पातळीवरून ही या भ्रष्टाचाराकडे कानाडोळा केला जात आहे.




तरी आमची मागणी आहे की, या संपूर्ण कामाची जिल्हा परिषदेचे वर्ग एकचे आधिकारी यांची नेमणूक करून आमचे प्रत्यक्षात ऑन कॅमेरा शूटिंग विहीर गोठा, घरकुल, शौचालय याची पहाणी करावी ही चौकशी करत आसताना ही भ्रष्ट यंत्रणा त्या लाभधारकांना भडकावून सरकारी यंत्रणेवर जमाव जमवून दबाव आणू शकतात त्यासाठी पोलीस बंदोबस्त द्यावा आणी सरकारी पैशाची लुट करणाऱ्या संबंधितावर निलंबणाची कार्यवाही करावी हे काम न करता पैसे उचलले हे सिध्द झाल्यावर हे संपूर्ण पैसे लाभार्थ्यांकडून भरपाई करून न घेता या संबंधित दोषी यंत्रणेकडून वसूल करावी व त्यांच्यावर लाभार्थ्यांना फसवणुक केल्याचा आणी सरकारी पैशाचा अपहार केल्याचा गुन्हा दाखल करावा. या निवेदनाची तात्काळ दखल घेऊन लगेचच आमचे समक्ष ऑन कॅमेरा शूटिंग चौकशी करावी. अन्यथा आपले कार्यालया समोर दि.१/०७/२०२४, सोमवार पासून दिनांक ४ / ०७ /२०२४ मागण्या मंजूर होईपर्यंत जिल्हा परिषद, लातूर कार्यालयासमोर अविनाश वाघमारे हे अमरण उपोषण करीत आहेत.

# लाडकी बहीण ठिक... पण भाऊरायाचे काय ?

किनवट/शेख शौकत :– महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची थाटामाटात घोषणा केली आणि याचा लाभ घेण्यासाठी महिलांची एकच घाई सुरू झाली. सेतू सुविधा केंद्राला जत्रेचे स्वरूप आले. ही योजना महिलांसाठी अत्यंत उपयुक्त असून अभिनंदनीय आहे. पण लाडक्या बहिणीबरोबरच शेतकरी भाऊरायांसाठी यापूर्वी घोषित केलेल्या नमो शेतकरी महासन्मान योजनेचा निधी शेतकऱ्यांना अद्याप मिळत नसल्याने 'लाडक्या बहिणीचे ठीक पण शेतकरी भाऊरायांच्या योजनेचे काय ? असा सवाल उपस्थित होत आहे. केंद्राच्या दोन हजार रुपये निधीसोबतच शेतकऱ्यांसाठी राज्याने सुद्धा दोन हजाराची घोषणा केली, केंद्राचे हप्ते शेतकऱ्यांना पडत आहेत पण राज्य सरकारचे नाही, त्यामुळेही योजना फसवी ठरत आहे लाडकी बहिणीची अंमलात आली आहे. बहिणी कागदपत्रासाठी . आता योजना लाडकी योजनेच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या सांगण्याप्रमाणे ३४ रुपये आकारले जावे असे असताना सगळीकडे शंभर, दीडशे घेऊन लाभार्थी महिलांची आर्थिक लूट होत आहे. एक प्रकारे महसूलच्या नावाखाली शासन व सेतू सुविधा केंद्रांनी मिळून संगनमताने लाभार्थ्यांची दिवसाढवळ्या लुट सुरू आहे. ही लूट तहसीलच्यासमोर सुरू झाली असून ती ग्रामीण भागातील सेतू सुविधा केंद्रापर्यंत पोहोचली आहे. या व्यतिरिक्त शेतीवाडीची कामे सुरू असताना शेतकरी, शेतमजूर महिला शेतीची आणि ईतर कामधंदे सोडून सेतू सुविधा केंद्रावर रांगा लावल्याने त्यांची मजुरी बुडत आहे. त्यातच सेतू केंद्रात नेटवर्क आणि साईट बंद असल्यास त्यांना हेलपाटे मारावे लागत आहेत. नेटवर्क व साईट बंद न पडण्याची खबरदारी घेणे प्रशासनाला गरजेचे झाले आहे. याबरोबरच सेतू सुविधा केंद्रावर आर्थिक लूट होणार नाही यासाठी कारवाई अपेक्षित आहे. एक रुपयात पीक विमा देण्याचे अपेक्षित असतांना सगळीकडे शेतकऱ्यांकडून शंभर रुपये आकारण्यात येत असल्याने शेतकऱ्यांना कोणी वाली आहे का ? आणि हे सर्व उघड्या डोळ्यांनी पाहणारे राजकिय नेते, कार्यकर्ते शेतकऱ्यांच्यामदतीलाधावूनयेणारकाय ? असाप्रश्नउपस्थितहोतआहे. :नमो शेतकरी सन्मान योजनेच्या निधीचा पत्ता नाही, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांना पीएम किसान सन्मान निधीद्वारे दोन हजार रुपये देण्याची घोषणा केली आहे. या घोषणेप्रमाणे शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे पडत आहेत. परंतू राज्य सरकारने घोषित केलेल्या नमो शेतकरी सन्मान योजनेच्या निधीचा अद्यापही पत्ता नाही.




# पांडुरंग देडे यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार

लातूर :– जोडजवळा येथील समता माध्यमिक विद्यालयातील वरिष्ठ लिपिक पांडुरंग देडे हे रविवार,दि.३० जून २०२४ रोजी नियम वयोमानाप्रमाणे सुमारे ३२ वर्षांच्या सेवेतून निवृत्त झाल्याबद्दल लातूरच्या यशवंतराव चव्हाण विद्यानिकेतन विद्यालयात त्यांचा पत्नी प्रेमा ,मुलगा ऋषिकेश देडेंसह भरपेहराव,पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला.शाळेचे मुख्याध्यापक धर्मराज शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली दि.३ जून रोजी किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रमुख आ.विक्रम काळे यांचा वाढदिवस आणि पांडुरंग देडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून यावेळी शाळेतील होतकरु व गरीब विद्यार्थ्यांना कपडे आणि खाऊंचे देडे दाम्पत्यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिकच्या मुख्याध्यापिका पुष्पा जाधव,सहशिक्षक सुधाकर होळंबे यांनी पांडुरंग देडे यांच्या सेवा कार्याच्या गौरव करुन उर्वरित आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या.



अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापक शिंदे म्हणाले की,पांडुरंग देडे यांनी आपल्या शाळेत सुमारे ३० वर्षे लिपिक म्हणून अतिशय सचोटीने सेवा करुन संस्थेला मदत केली.त्यांनी सेवेशिवाय बाहेर शिक्षकेतर संघटना,सामाजिक, सांस्कृतिक व अन्य क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केले,त्यांचा आम्हाला अभिमान आहे.त्यांना निरोगी आरोग्य लाभो अशा शुभेच्छाही दिल्या.प्रेमा देडे यांनी आपण घर,मुले सांभाळले पण देडे सरांनी बाहेरच्या जगात मोठे कार्य केले,ते इतरांसाठी आदर्श आहे, असे मनोगत व्यक्त केले.पांडुरंग देडे यांनीही शाळेने केलेल्या सत्काराबद्दल आणि स्मृतीशेष वसंत काळेय यांनी नोकरी दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंद्रजित तुरुप यांनी केले.सूत्रसंचालन सुधाकर होळंबे यांनी केले. सुरेखा कांबळे यांनी आभार प्रदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी गणेश माने,संगीता भालेकर,अंकिता भालेकर,शिक्षकेतर कर्मचारी चांगदेव कोळी,हरिभाऊ पाडे, लिंबराज गायकवाड आदिंनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाला विद्यार्थी उपस्थित होते.

## प्रवाशांच्या सेवेसाठी आता एसटीचा 'प्रवासी राजा दिन'

मुंबई : प्रवाशांच्या समस्या, तक्रारी वजा सूचना यांचे स्थानिक पातळीवर जलद गतीने निराकरण होण्याच्या उद्देशाने प्रत्येक आगारात दर सोमवारी आणि शुक्रवारी 'प्रवासी राजा दिन' आयोजित करण्यात येणार आहे. या दिवशी एसटीचे जिल्हा प्रमुख म्हणजे विभाग नियंत्रक एका आगारात जाऊन प्रवाशांच्या समस्या, तक्रारी, सुचना ऐकून घेतील. त्या तातडीने सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करतील. त्यामुळे प्रवाशांचे समाधान होऊन प्रवासी सेवेचा दर्जा व गुणवत्ता वाढण्यास मदत होईल, असे एसटी महामंडळाचे मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी सांगितले.

लेखी तक्रारींची थेट मध्यवर्ती कार्यालय घेणार दखल ही अभिनव योजना १५ जुलै पासून सुरू होणार आहे. प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा–महाविद्यालये यांनी आपल्या समस्या–तक्रारी, सुचना लेखी स्वरूपात दर सोमवारी व शुक्रवारी संबंधित आगारात सकाळी १० ते २ या वेळेत मांडू शकतात. त्यावर विभाग नियंत्रक तातडीने कार्यवाही करतील. प्रवासी राजा दिन कोणत्या दिवशी कोणत्या आगारात होणार आहे, याचे वेळापत्रक विभाग नियंत्रक त्या, त्या वेळी जाहीर करतील. विशेष म्हणजे प्रत्येक लेखी तक्रारीची नोंद ठेवण्यात येणार असून याबाबत काय कार्यवाही केली आहे, यावर मध्यवर्ती कार्यालय लक्ष ठेवणार आहे.

# राज्यात पाऊस पुन्हा जोरदार हजेरी लावणार

पुणे : राज्यात पावसाने पुन्हा एकदा जोरदार हजेरी लावली आहे. राज्याच्या अनेक भागात पुन्हा एकदा पावसाने जोरदार हजेरी लावली आहे, काही दिवसांच्या विश्रांतीनंतर महाराष्ट्राच्या विविध भागात पावसाने दमदार हजेरी लावली आहे. आज पुन्हा एकदा हवामान विभागाकडून पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. पुढील २४ तासांमध्ये कोकण, विदर्भासह अन्य काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये मध्यम पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे.

मॉन्सूनचा आस असलेला कमी दाबाचा पट्टा उत्तरेकडे असल्याने राज्यात पावसाचा जोर काहीसा कमी झाला आहे. कोकण आणि घाटमाथ्यावर पावासाने उसंत घेतल्याचे चित्र आहे. कोकण आणि घाटमाथ्यावर गुरुवारी (ता. ४) जोरदार सरींची शक्यता आहे, तर विदर्भात वादळी वा–यासह जोरदार पावसाचा इशारा (येलो अलर्ट) हवामान विभागाने दिला आहे. बुधवारी (ता. ३) सकाळपर्यंतच्या २४ तासांमध्ये कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, मध्य महाराष्ट्रातील कोल्हापूर आणि विदर्भातील गडचिरोली जिल्ह्यांत पावसाचा जोर अधिक असल्याचे दिसून आले. कोल्हापुरातील आजरा येथे येथे सर्वाधिक १११ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. उर्वरित राज्यात हलक्या ते मध्यम पावसाच्या सरी कोसळल्या. राज्याच्या अनेक भागांत ऊन–सावल्यांच्या खेळात उन्हाचा चटका वाढला आहे. मॉन्सून पुन्हा सक्रिय होऊन जोरदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे.

मॉन्सूनचा आस असलेला कमी दाबाचा पट्टा पंजाबच्या फिरोजपूरपासून रोहतक, लखनौ, बालिया, पूर्णिया, ते मणिपूरपर्यंत सक्रिय आहे. यातच पाकिस्तानपासून बांगलादेशपर्यंत आणखी एक कमी दाबाचा पट्टा तयार आहे. गुजरात आणि परिसरावर चक्राकार वा–याची स्थिती आहे. गुजरात ते केरळ किना–याला लागून हवेचा दक्षिणोत्तर कमी दाबाचा पट्टा सक्रिय असल्याने किना–यालगत ढग जमा होण्यास सुरुवात झाली आहे.



कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांच्या घाटमाथ्यावर गुरुवारी जोरदार पावसाचा, तर विदर्भात तुरळक ठिकाणी विजांसह पावसाचा इशारा (येलो अलर्ट) आहे. तर उर्वरित राज्यात हलक्या ते मध्यम सरींसह पावसाची उघडीप राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

जोरदार पावसाचा इशारा रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, कोल्हापूर (येलो अलर्ट) आणि बुलडाणा, अकोला, अमरावती, वाशिम, वर्धा, यवतमाळ, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली येथे रेड अलर्टचा इशारा देण्यात आला आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE